## १५ बालसभा

परिसरातील एकही विद्यार्थी शालाबाह्य राहणार नाही यासाठी प्रयत्न करूया. हेच आपल्याकडून त्यांना खरे अभिवादन ठरेल. एवढे बोलून मी थांबतो. जयहिंद!

**तन्वी** : धन्यवाद कुणाल! आता आभार प्रदर्शन चंदर करेल.

**चंदर** : आज आमच्या वर्गाच्या या बालसभेला मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवृंद उपस्थित राहिले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आमच्या वर्गशिक्षिका बाईंनी आम्हांला मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळेचे रखवालदार मामा, सेविका मावशींनी आम्हांला कामात खूप मदत केली, म्हणूनच आम्ही ह्या सभागृहाची सजावट, मंचव्यवस्था, मुलांची बैठक व्यवस्था करू शकलो. त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. नीता व तन्वीने अतिशय छान सूत्रसंचालन केले, मीनल व जॉनने व्यासपीठ व्यवस्था केली. प्रकाशने ध्वनी व्यवस्था केली. या सभागृहात तुम्हांला महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील प्रसंगांचे चित्र रेखाटन दिसते आहे. कुमुद, संपदा, प्रफुल्ल व चिनप्पा यांनी ही प्रसंग चित्रे रेखाटली आहेत. त्यामुळे बालसभेची वातावरण निर्मिती सुरेख झाली, तसेच आपल्या सर्वांचे मी इयत्ता सहावीच्या वतीने आभार मानतो व कार्यक्रम संपला असे अध्यक्षांच्या वतीने जाहीर करतो.

**पाळंदूर शाळेतील विद्यार्थ्यांनी वरील पद्धतीने बालसभा घेतली. ऊर्मिला माने हिच्या दापोलीच्या शाळेतील मुलांनीदेखील या कार्यक्रमाच्या निमित्ताने बालसभेचे आयोजन केले. त्यात वरील बालसभेतील कार्यक्रमांव्यतिरिक्त आणखी काही कार्यक्रमांची भर घातली आणि आपल्या वर्गाची बालसभा संपन्न केली. त्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवले. नाटिका सादर केल्या. त्यांच्या जीवनातील काही प्रसंगांचे छोटे छोटे तक्ते व बॅनर्स तयार केले.**

**टेस्ट सोडवा.**

**ऑनलाईन टेस्ट**

जाणून घेऊया.

## 11 गुणोत्तर – प्रमाण

नीलिमाचे वय रमेशच्या वयाच्या दुप्पट आहे. हीच माहिती नीलिमा व रमेश यांच्या वयांचे प्रमाण 2:1 आहे असे लिहितात. 2:1 याचे वाचन **'दोनास एक'** असे करतात. गणिती भाषेत दोन संख्यांचे प्रमाण गुणोत्तराच्या भाषेत लिहिता येते. 2:1 हे प्रमाण गुणोत्तर रूपात $\frac{2}{1}$ असेही लिहितात.

**प्रमाणाची व्यवहारातील उदाहरणे**



उदा. जानकी अम्मांनी बनवलेल्या इडल्या व डोसे चवदार असतात. इडलीच्या पीठासाठी त्या 1 वाटी उडीद डाळीस 2 वाट्या तांदूळ हे प्रमाण वापरतात, तर डोसा बनवताना 1 वाटी उडीद डाळीस 3 वाट्या तांदूळ घेतात, म्हणजे इडलीसाठी डाळ व तांदूळ यांचे प्रमाण 1:2 किंवा गुणोत्तर $\frac{1}{2}$ आहे, तर डोशासाठी ते प्रमाण 1:3 म्हणजेच त्यांचे गुणोत्तर $\frac{1}{3}$ आहे.



उदा. मार्गारेटची बिस्किटे छान असतात. ती बिस्किटांसाठी 2 वाट्या साखरेबरोबर 3 वाट्या गव्हाचे पीठ वापरते म्हणजे बिस्किटांत साखर व पीठ यांचे प्रमाण 2:3 किंवा त्यांचे गुणोत्तर $\frac{2}{3}$ आहे.

समजून घ्या..



Let's learn.

## 11 Ratio – Proportion

Nilima's age is twice as much as Ramesh's. We can give the same information by saying that Nilima's and Ramesh's ages are in the proportion **2:1**. It is read as **'Two is to one'**. In mathematics, the proportion of two numbers can also be expressed as their ratio. The proportion 2:1 is written as $\frac{2}{1}$ in the form of a ratio.

**Examples of Proportion in Daily Life**



**Example :** Jankiamma's idlis and dosas are delicious. For idlis, she uses udad dal and rice in the proportion 1 cup dal to 2 cups of rice. But for dosas, the proportion is 1 cup dal to 3 cups of rice. That is, for idlis the proportion of dal and rice is 1:2 or the ratio is $\frac{1}{2}$ whereas for dosas, the proportion is 1:3 or the ratio is $\frac{1}{3}$.



**Example :** Margaret makes great biscuits. She uses 3 cups of wheat flour with 2 cups of sugar. It means that the proportion of sugar and flour in the biscuits is 2:3 or that the ratio is $\frac{2}{3}$.

read and understand.

**Let's rearrange their sentences properly on the timeline -**

**Timeline**

| | Actions in the past | The situation at present | Future actions/plans |
|---|---|---|---|
| a | I sharpened my tusks yesterday. | I am a wild boar. I live in this jungle. Now I am ready. | I will drive my enemies away. |
| b | Last week my teacher asked us to do a project. | Hi ! I am Nu-jo. I live on a faraway planet. | I will visit Planet Earth for my project. |
| c | Once he played a trick on me. I taught him a lesson. | Good afternoon, friends. This is my friend, Fox. | Now he will behave himself. |
| d | We tried to use a magic herb on a poor merchant. | We have an inn in Japan. | We will never use the magic herb again. |

**LEARNING about LANGUAGE**

**TENSES : The past, the present and the future**

Note the verbs in the sentences in the three columns. In the 'past' column, they have different forms — sharpened, asked, played, taught, tried. In the 'future' column, the verbs have 'will' before them. The different forms of verbs that show the 'time' of the action are called tenses. Guess the present tense of 'taught' and the past tense of 'is', 'have' and 'live'.

# ७. मौर्यकालीन भारत

७.१ ग्रीक सम्राट सिकंदराची स्वारी

७.२ मौर्य साम्राज्य

**माहीत आहे का तुम्हांला?**

इ.स.पू. सहाव्या शतकात इराणमध्ये सायरस नावाच्या राजाने मोठे साम्राज्य प्रस्थापित केले होते. हे साम्राज्य वायव्य भारतापासून रोमपर्यंत आणि आफ्रिकेतील इजिप्तपर्यंत पसरलेले होते. इ.स.पू. ५१८ च्या सुमारास दार्युश नावाच्या इराणी सम्राटाने भारताचा वायव्येकडील प्रदेश आणि पंजाबपर्यंतचा काही भाग जिंकून घेतला होता. दार्युशने या प्रदेशातील काही सैनिक आपल्या सैन्यात भरती केले होते. ग्रीक इतिहासकारांच्या लेखनातून त्यांची माहिती मिळते. सम्राट दार्युशच्या काळात भारत आणि इराण यांच्यामध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले. त्यातून व्यापार आणि कला या क्षेत्रांतील देवाणघेवाण वाढली. सम्राट दार्युशने त्याच्या साम्राज्यात सर्वत्र 'दारिक' नावाचे एकाच प्रकारचे चलन लागू केले. त्यामुळे व्यापार करणे सोपे झाले. पर्सिपोलीस हे राजधानीचे शहर सम्राट दार्युशच्या काळात बांधले गेले. पर्सिपोलीस हे ठिकाण इराणमध्ये आहे.



दारिक

## ७.१ ग्रीक सम्राट सिकंदराची स्वारी

ग्रीक सम्राट अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर याने इ.स.पू. ३२६ मध्ये भारताच्या वायव्य प्रदेशावर स्वारी



सम्राट सिकंदर

केली. सिंधू नदी ओलांडून तो तक्षशिलेस आला. या मार्गावर काही स्थानिक भारतीय राजांनी त्याच्याशी निकराचा लढा दिला. तरीही पंजाबपर्यंत पोचण्यात सिकंदर यशस्वी झाला, मात्र या स्वारीत त्याच्या सैनिकांना फार हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. त्यांना मायदेशी जाण्याचे वेध लागले होते. त्यांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. सिकंदराला माघार घेणे भाग होते. भारतातील जिंकलेल्या प्रदेशांच्या व्यवस्थेसाठी त्याने ग्रीक अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आणि त्यांना 'सत्रप' असे म्हटले. त्यानंतर तो परत फिरला. वाटेत बॅबिलोन येथे इ.स.पू. ३२३ मध्ये तो मरण पावला. हे स्थळ आजच्या इराकमध्ये आहे.

सिकंदराच्या आगमनामुळे भारत आणि पश्चिमेकडील जग यांच्यातील व्यापार वाढला. सिकंदराच्या बरोबर जे इतिहासकार होते, त्यांनी त्यांच्या लेखनातून पश्चिमेकडील जगाला भारताचा परिचय करून दिला. ग्रीक मूर्तिकलेचा भारतीय कलाशैलीवर प्रभाव पडला. त्यातून पुढे गांधार नावाच्या कलाशैलीचा उदय झाला. ग्रीक राजांची नाणी वैशिष्ट्यपूर्ण असत. त्यावर एका बाजूला ते नाणे पाडणाऱ्या राजाचे चित्र, तर दुसऱ्या बाजूला एखाद्या ग्रीक देवतेचे चित्र असे. नाण्यावर त्या राजाचे नाव असे. सिकंदराची नाणीही



सिकंदराचे चांदीचे नाणे–दोन्ही बाजू

अशाच प्रकारची होती. नंतरच्या काळात भारतातील राजांनीही अशा प्रकारची नाणी पाडण्यास सुरुवात केली.

## वाचा व प्रश्न तयार करा.

## टेस्ट सोडवा.

## टेस्ट ब्लॉगवर

## www.gurumauli.in

## ६. महासागरांचे महत्त्व

**सराव करा.**

- प्रत्येक ठिकाणच्या कमाल व किमान तापमानांतील फरक काढा व तक्त्यातील रिकाम्या रकान्यात मांडा.
- ज्या ठिकाणच्या तापमानातील फरक १०° से. पेक्षा जास्त आहे ते रकाने लाल रंगाने रंगवा.
- उरलेले रकाने निळ्या रंगाने रंगवा व ती ठिकाणे कोणती ते सांगा.
- नकाशासंग्रहातून ही ठिकाणे शोधा.
- कोणती ठिकाणे महासागरांच्या जवळ आहेत ? त्या ठिकाणाची तापमान कक्षा कमी आहे की जास्त आहे ? ते सांगा.
- तापमान कक्षेत फरक होण्यामागचे प्रमुख कारण काय असावे ?
- ही सर्व स्थाने कोणत्या कटिबंधात येतात ?
- स्थानांच्या तापमानातील फरक किती आहे ?
- कोणती ठिकाणे महासागरांपासून लांब आहेत ? त्या ठिकाणाची तापमान कक्षा कमी आहे की जास्त आहे ? ते सांगा.
- सर्वांत कमी व सर्वांत जास्त तापमान कक्षा असलेली ठिकाणे कोणती ?
- देश, किमान व कमाल तापमानाचा स्तंभालेख काढा. त्यासाठी सुयोग्य रंगसंगती वापरा.

### भौगोलिक स्पष्टीकरण

- वरील कृतीवरून तुमच्या असे लक्षात आले असेल की पृथ्वीवर विविध स्थानांच्या तापमानांत फरक आढळतो. तसेच सरासरी कमाल व किमान तापमानांतही तफावत असते. ही तफावत किनारी प्रदेशात (समुद्रसान्निध्य) कमी तर समुद्रापासून दूर असलेल्या प्रदेशात (खंडांतर्गत) जास्त असते.

याचा अर्थ महासागर, समुद्र व मोठे जलाशय यांच्या सान्निध्यातील प्रदेशांत दिवसभराच्या तापमानात फारसा फरक पडत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या जलाशयातून बाष्पीभवनाद्वारे हवेत मिसळणारे बाष्प होय. हवेतील हे बाष्प जमिनीतून निघालेली उष्णता शोषून घेते व साठवते. त्यामुळे किनारपट्टीच्या भागात तापमान सम राहते.

**वाचा व समजून घ्या.**

- विषुववृत्तीय प्रदेशात सूर्यकिरण लंबरूप पडतात. हे तुम्ही अभ्यासले आहे. त्यामुळे या भागात जमीन व पाणी जास्त तापते याउलट ध्रुवीय प्रदेशात जमीन व पाणी शीत राहते. जमीन व पाण्याच्या तापण्यातील या फरकामुळे पृथ्वीच्या वातावरणातील हवा असमान तापते व परिणामी पृथ्वीवर वायुदाब पट्टे निर्माण होतात. या वायुदाबातील फरकामुळे 'वारे' वाहतात, त्यांना ग्रहीय वारे असेही म्हणतात. हे वारे महासागरात पाण्याचे प्रवाह निर्माण करतात. हे प्रवाह 'उष्ण' किंवा 'शीत' असतात. उष्ण प्रवाह नेहमी थंड प्रदेशांकडे वाहतात तर शीत प्रवाह नेहमी उष्ण प्रदेशांकडे वाहतात. म्हणजेच ते विषुववृत्ताकडून ध्रुवीय प्रदेशाकडे व ध्रुवीय प्रदेशाकडून विषुववृत्ताकडे वाहतात. त्यामुळे पृथ्वीवरील उष्णतेचे फेरवितरण होते. उष्ण प्रदेशांकडे आलेले शीत प्रवाह तेथील किनारी भागाचे तापमान सौम्य करतात, तर थंड प्रदेशांकडे आलेले उष्ण प्रवाह तेथील किनारी भागाचे तापमान उबदार करतात. आकृती ५.६ चा अभ्यास करताना आपण हे पाहिले आहे.

वरील दोनही प्रकारे महासागर जागतिक तापमानाचे नियंत्रक म्हणून काम करताना दिसतात. महासागरांच्या प्रचंड विस्तारामुळे महासागरातील पाण्याची वाफही मोठ्या प्रमाणात होते. ही क्रिया सतत सुरू असते. त्यापासून पृथ्वीवर पाऊस (पर्जन्य) पडतो. महासागर हे पर्जन्याचे उगमस्थान आहे. पर्जन्याचे पाणी नदी-नाल्यांद्वारे शेवटी महासागरातच मिसळते. म्हणजेच पर्जन्यचक्राची सुरुवात व सांगता देखील महासागरातच होते हे लक्षात घ्या.



### माहीत आहे का तुम्हांला ?

सागरसान्निध्य लाभलेल्या प्रदेशात हवामान सम असल्यामुळे मानवी लोकसंख्येची घनता या भागामध्ये जास्त असते. हवामानाबरोबरच समुद्रातून मिळणारी विविध उत्पादने, विपुल प्रमाणात उपलब्ध होणारे खाद्य यांमुळे सागरी किनारी भाग मानवाला नेहमी आकर्षित करत आला आहे.

# १० बल व बलाचे प्रकार

## बलाचे प्रकार

### १. स्नायू बल

चित्र १०.१ मध्ये होणाऱ्या सर्व क्रियांमध्ये शरीरातील हाडे व स्नायूंच्या साहाय्याने हालचाली घडून येतात. शेजारील चित्रामध्ये वजन उचलणारी व्यक्ती स्नायू बलाचा वापर करून वजन उचलते.



१०.३ : वजन उचलणे

स्नायूंच्या साहाय्याने लावलेल्या बलाला स्नायू बल म्हणतात.

**जरा डोके चालवा.**

तुम्ही रोजच्या जीवनात स्नायू बलाचा वापर करून कोणती कामे करता ?

वाचा व समजून घ्या.



# 10. Force and Types of Force

## Types of force

### 1. Muscular force

In all the actions shown in the picture 10.1, the movements take place with the help of the bones and muscles in the body. The person in the picture alongside is lifting the weight by using muscular force.



10.3 : Lifting a weight


**The force applied with the help of muscles is called muscular force.**

**Use your brain power !**

For which tasks in your day-to-day life do you use muscular force ?

Read and Understand.

✲ पंचमाक्षर (ङ, ञ,ण,न,म) के अनुसार पतंगों में उचित शब्दों की जोड़ियाँ मिलाओ ।




**जोडिया मिलाओ|**

## माझा ऑनलाईन अभ्यास – सराव चाचणी

| इयत्ता सहावी – मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| ऑनलाईन टेस्ट अपडेट होत आहेत. | |
| 14. आता उजाडेल | Click Here |
| 15. बालसभा | Click Here |
| 16. सफर मेट्रोची | लवकरच |
| 17. दुखणं बोटभर | लवकरच |
| 18. बहुमोल जीवन | लवकरच |

| इयत्ता सहावी - इतिहास | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| 6. जनपदे आणि महाजनपदे | Click Here |
| 7. मौर्यकालीन भारत | लवकरच |
| 8. मौर्य साम्राज्यानंतरची राज्ये | लवकरच |

**इतर विषय टेस्ट लवकरच अपडेट होतील.**

